# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रा. विनोद मनोहर गायकवाड यांनी " रत्नाकर मतकरी यांच्या गूढकथा लेखनाचे विशेष " ("खेकडा" व "संदेह" या कथासंग्रहाच्या आधारे अभ्यास) या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधन कार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

प्रा. विनोद मनोहर गायकवाड यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. ( मराठी ) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

कोल्हापूर
दि. २४ ऑगस्ट १९९४

( डॉ. विश्वनाथ शिंदे )
मार्गदर्शक

# प्र ति ज्ञा प त्र

" रत्नाकर मतकरी यांच्या गूढकथालेखनाचे विशेष"
( " खेकडा " व " संदेह " या कथासंग्रहाच्या आधारे अभ्यास)
या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्·फिल· ( मराठी ) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे·
ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही·

कोल्हापूर
दिनांक: २४|८|९४

प्रा·विनोद मनोहर गायकवाड
अभ्यासक

## ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंधिका साकार होत असताना अनेक व्यक्तींचे विविध स्वरुपात सहाय्य झाले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे मला परम कर्तव्य वाटते.

माझे मार्गदर्शक गुरुवर्य डॉ.विश्वनाथ शिंदे यांच्याविषयीच्या माझ्या कृतज्ञतेच्या भावना कशा व्यक्त कराव्यात याबद्दल मी गोंधळून गेलो आहे. मला बोलते करुन माझ्याही नकळत त्यांनी माझी आवड हेरली आणि मला आवडणारा विषय संशोधनासाठी दिला. केवळ प्रबंधविषयकच नव्हे तर आर्थिक, कौटुंबिक अडचणीमध्येही त्यांनी अत्यंत आपुलकीने, जिव्हाळयाने मार्गदर्शन व सहाय्य केले. एका वर्षातच एम्.फिल.ची परीक्षा व प्रबंधिका पूर्ण झालीच पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांचा सततचा सहवास आणि नेमके मार्गदर्शन यामुळेच मी एका वर्षात प्रबंधिका पूर्ण करु शकलो. त्यांचे ऋण कधीच फिटणारे नाहीत. आणि त्यांचे शाब्दिक आभार मानण्याचा करंटेपणा मी करणार नाही. सौ.उज्वला शिंदे वहिनींच्या प्रोत्साहनाचा आणि सहकार्याचा भक्तीभावाने उल्लेख केल्याशिवाय मला राहवत नाही.

विभागाचे प्रमुख, संत साहित्याचे गाढे अभ्यासक मा.डॉ.ल.रा.नसिराबादकर यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतानाही त्यांच्या विव्दत्तेचा आणि ऋषीतुल्य व्यक्तिमत्वाचा धाक जाणवत आहे. विभागात मी हजर झाल्यानंतर "विनोद" अशी एकेरी हाक मारुन त्यांनी मला क्षणार्धात आपलेसे केले. त्यांच्या सानिध्याने अभ्यासात एक प्रकारची शिस्त आली. प्रा.प्रभाकर पाटील सरांच्यामुळे सौंदर्यशास्त्र तर कळलेच पण शिकवण्यामध्येही सत्य शिव आणि सुंदराचा साक्षात्कार होतो, त्याचेही आकलन झाले. कवीवर्य डॉ.रवींद्र ठाकूर सरांनी "श्वास ही प्रबंध होआवे" चा हस्तमुख आग्रह मनावर बिंबविला. माझ्या प्रबंधिकेच्या श्रेयात या सर्वांचाच "सरस्वतीचा वाटा" आहे.

प.पू.शिक्षण महार्षि डॉ.बापूजी साळुंखे यांनी दाखविलेल्या ज्ञान व सेवा मार्गावरुन संपूर्ण संस्थेचा सुवर्णरथ नेणारे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी मा.अभयकुमार साळुंखे आणि संस्थेच्या उन्नत्तीसाठी अहर्निश झटणारे कर्तृत्वसंपन्न जॉइंट सेक्रेटरी मा.जी.एल्.ऐनापुरे सर यांचे मार्गदर्शन मोलाचे आहे. "शिक्षक – छात्र" म्हणून निवड करताना त्यावेळचे प्राचार्य मा.उत्तमराव देशमुख यांच्या सहाय्याचा गौरवपूर्ण उल्लेख करणे भाग आहे. तुळजाभवानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.आर.ए.कदम यांचे मार्गदर्शन व मौलिक मदत यांचा मी अत्यंत आदराने उल्लेख करतो. "संस्थेचे नाव होईल अशा इर्षेने अभ्यास करा" या त्यांच्या आज्ञेने एक जिद्द निर्माण झाली. हरप्रकारची मदत अत्यंत तत्परतेने त्यांनी केली. मा.कदम सर प्राचार्यपदी असल्यानेच मी एम्.फिल.ला डेप्युटेशनवरती येऊ शकलो, याचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

माझे प्राध्यापक मित्र जी.पी.कापसे, जे.ए.म्हेत्रे, आर.ए.रायखेलकर, डी.वाय.इंगळे, आर.व्ही.दापके, शाहुराज माने, अशोकराव वडगणे, सौ.सविता पाटील, प्रा.ढकळे, प्रा.शेतसंदी, प्रा.अशपाक शेख, प्रा.धनजंय लोंढे, ग्रंथपाल मिलिंद पाटील याबरोबरच शिक्षकेतर कर्मचारी सर्वश्री जोशी (ऑफिस सुपरिडेंट) पी.जी.पाटील, साळवी, संजू बाळेकुंद्री, देशमुख, गायकवाड, बेळंबेमामा, म्हस्के, पांचाळ, शिंदे या सर्वांचेच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले.

जीवनातील कोणत्याही संकटसमयी सत्याची तलवार घेऊन उभा राहाणारा माझा झुंजार मित्र पांडूरंग शिंदे, दगडू पवार, माझा भाऊ दिपक गायकवाड यांनी माझ्या बहुतेक सगळया जबाबदा-या स्वतःच्या समजून त्या स्वतःच्या खंद्यावर घेतल्या व मला अभ्यासासाठी मुक्त केले. माझे एम्.फिल.चे सहाध्यायी कवीवर्य प्रसन्नकुमार पाटील, मीरा जोशी, दत्ता पाटील, पीएच्.डी.चे अभ्यासक सौ.मंजुषा दातार, प्रा.महादेव देशमुख आणि माझी पत्नी सौ.स्वाती यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले. प्रा. सलमा अपराद यांची मदत मोलाची झाली.

माझे आई वडील, गुरुवर्य बी.डी.जाधव सर आणि पाठक गुरुजी, वाघोलीकर यांच्या आशीर्वादाचा उल्लेख करुन त्यांच्या ऋणात राहाणे मी पसंत करतो.

प्रबंध लेखनासाठी बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, करवीर नगर वाचनालय, कोल्हापूर, तुळजाभवानी महाविद्यालयाचे ग्रंथालय, तुळजापूर यामधील पुस्तके व स्टाफ यांची मदत मोलाची आहे.

प्रबंधिका टंकलिखित करणारे माझे परम मित्र श्री.कदम आणि हरत-हेची मदत करणारे श्री.देवगोंडा चौगुले तसेच प्रबंधिकेचे उत्तमप्रकारे बायडिंग प्रिंटिंग करणारे हेमंत मुद्रणालय या सगळयांचाच या कामी मोलाचा सहभाग आहे. म्हणून वरील सर्वांचेच कृतज्ञतापूर्वक मी आभार मानतो.

प्रा.विनोद गायकवाड